आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- छत्तीसगडमधे सुरक्षादलासोबतच्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार, दोन जवानांना वीरमरण

- आनंदवन प्रकल्पाला दहा कोटी रुपयांचा निधी देण्याची मुख्यमंत्री फडनवीस यांची घोषणा

- दिल्ली विधानसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर आतिशी यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राची २५ सुवर्ण पदकांसह एकूण ११३ पदकांची कमाई

<><><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षादलं आणि नक्षलवाद्यांत झालेल्या चकमकीत ३१ नक्षली ठार झाले असून त्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले आहेत. या चकमकीत दोन जवानांना वीरमरण आलं आहे तर दोन जवान जखमी असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. नक्षलवाद्यांबरोबरची चकमक अद्याप सुरू आहे. दरम्यान, चकमक झाली त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त केला आहे.

बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सुरक्षा दलानं आज सकाळी शोधमोहिम सुरू केली. ही मोहिम सुरू असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिलं. यात ३१ नक्षलवादी ठार झाले असल्याची माहिती बस्तरचे पोलिस महानिरीक्षक

सुंदरराज पी. यांनी दिली. या चकमकीत राज्य पोलीस दलाचा एक कर्मचारी तर स्पेशल टास्क फोर्सचा एक असे दोन जवान शहीद झाले, तर दोनजण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती ही सुंदरराज यांनी दिली.

<><><><><>

बाबा आमटेंनी सुरू केलेल्या आनंदवन या प्रकल्पाला दहा कोटींचा कॉर्पस फंड देण्याची घोषणा आज मुख्यमंत्री देवेद्र फडनवीस यांनी केली. आनंदवनात महारोगी सेवा समितीच्या पंचाहत्तर वर्षपूर्ती कृतज्ञता मित्र मेळाव्यात ते बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२७ पर्यंत देश कुष्ठरोगमुक्त करण्याचं ठरवलं आहे. आनंदवनसारख्या समाजसेवी संघटनांच्या मदतीनेच हे साध्य करता येईल असं ते म्हणाले.

कुष्ठरोग्यांची संख्या लक्षणीयरित्या घटली असली तरी मोठ्या प्रमाणावर अजून कार्य करायचं बाकी आहे असं नमूद करत आनंदवनात पाचशे जणांसाठी निवासी रुग्णकेंद्र उभारण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.  रुग्णालयाला देण्यात येणारं अनुदान प्रतिरुग्ण २२०० वरुन ६ हजार पर्यंत तर  पुनर्वसनासाठीचंही अनुदान दोन हजार पासून ६ हजार पर्यंत वाढवल्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंतही यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्यावहिल्या  कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्याची घोषणा त्यांनी  यावेळी केली.

<><><><><>

राष्ट्रीय आमदार संमेलन पुण्यात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झालं. राजकारणातली ध्येय, विचार मांडण्यासाठी आणि क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी हे योग्य व्यासपीठ आहे, असं प्रतिपादन फडणवीस यांनी

केलं. सुदृढ लोकशाहीसाठी आणि भारतीय संविधानाला अनुरूप काम करण्यासाठी आपण राजकारणात आलो असल्याची भावना लोकप्रतिनिधींनी मनात बाळगावी, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री आतिशी यांनी आज नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांची भेट घेऊन त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. नव्या सरकारची स्थापना होईपर्यंत आतिशी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

दिल्ली विधानसभेच्या काल जाहीर झालेल्या निकालात भाजपाने जवळपास तीन दशकांनंतर जोरदार पुनरागमन करत ७० पैकी ४८ जागांवर विजय मिळवला, आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावं लागलं, तर काँग्रेसला भोपळा फोडण्यात अपयश आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परदेश दौऱ्यावरून परतल्यानंतर भाजपा सत्तास्थापनेचा दावा करण्याची शक्यता आहे. दिल्लीत भाजपाला मिळालेला विजय हे भाजपाच्या डबल इंजिन सरकारवर देशाच्या असलेल्या विश्वासाचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी काल दिल्ली भाजपा मुख्यालयात कार्यकर्त्यांशी बोलताना केलं.

**दरम्यान**, काल जाहीर झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालात उत्तर प्रदेशातल्या मिलकीपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे चंद्रभानू पासवान विजयी झाले आहेत, तर तमिळनाडूच्या इरोड पूर्व विधानसभा मतदारसंघातून द्रविड मुन्नेत्र कळगम पक्षाचे चंदिराकुमार व्ही. सी. यांनी बाजी मारली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांसोबत धोरणात्मक, आर्थिक आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी

आणखी बळकट करणं यावर त्यांच्या या दौऱ्यात मुख्य भर असणार आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून प्रधानमंत्री १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित एआय कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्ष पद ते भूषवतील. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर विविध राष्ट्रांचे नेते चर्चा करणार आहेत.

फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील.

**<><><><>**

पहिली जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषद म्हणजेच ‘वेव्हज्’ भारताला आशयनिर्मितीचे जागतिक केंद्र म्हणून उदयाला आणेल, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. सर्जनशीलतेचे शक्तीपीठ बनण्याच्या दृष्टीनं भारतात पाया रचला जात आहे, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी वेव्हजच्या सल्लागार मंडळाची बैठक घेतली. या वर्षी पहिली वेव्हज् परिषद १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे, अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे. हा कार्यक्रम परीक्षेतील तणावमुक्त अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणारा तसंच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा महत्वपूर्ण उपक्रम असल्याची प्रतिक्रिया बीड इथले शिक्षक कृष्णा जाधव आणि विद्यार्थ्याने व्यक्त केली आहे.

**<><><><>**

विमा, निवृत्तीवेतन आणि शेअर बाजार हे तीन स्तंभ देशाच्या आर्थिक विकासाचे तीन महत्त्वपूर्ण पैलू असून या माध्यमातून आलेली गुंतवणूक उद्योगव्यवसायांना समृद्ध करु शकते, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं झालेल्या गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेत ते काल बोलत होते. आर्थिक वाढीसाठी आर्थिक साक्षरता महत्वाची असून यामध्ये लोकांना जागृत करण्याची आवश्यकता आहे, वित्त पुरवठ्याचे स्रोत आणि तंत्रज्ञानापेक्षाही विश्वासाहर्ता अधिक महत्वाची असते, असं गडकरी म्हणाले. देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी आपल्याला प्रत्येक क्षेत्रात सर्वांगीण प्रगती करावी लागेल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रानं सर्वाधिक ११३ पदकांची कमाई केली आहे. यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत ४२ सुवर्णपदकांसह सेना दलाचा संघ पहिल्या, तर ३० सुवर्णपदकांसह कर्नाटकाचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं तिसरं स्थान कायम राखलं आहे. यजमान उत्तराखंडचा संघ १४ सुवर्णपदकांसह सहाव्या स्थानी आहे.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज कटक मधे बाराबती इथं सुरू आहे. यशस्वी जयस्वालच्या जागी विराट कोहलीला संघात स्थान देण्यात आलं आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या १९ षटकांत २ गडी बाद ११६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मध्यप्रदेशातल्या सतना इथं आज पहाटे झालेल्या दोन वाहनांच्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त मिनी ट्रक भाविकांना प्रयागराज इथं कुंभमेळ्याला घेऊन जात होती.

**<><><><><>**

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यात वाळू घेऊन जाणारा डंपर अंगावर पडल्यानं तीन महिला आणि एका लहान मुलाचा मृत्यू झाला. इथं रस्त्याचं काम सुरू असताना एका अरुंद वाटेवरून जाण्याच्या प्रयत्नात असलेला डंपर उलटला आणि काम करणाऱ्या मजुरांच्या अंगावर पडला. यात मृत्युमुखी पडलेल्यांना क्रेन आणि बुलडोझरनं बाहेर काढून रुग्णालयात नेलं, पण तिथं त्यांना मृत घोषित केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा प्राथमिक परीक्षा २०२५ साठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत येत्या १८ फेब्रुवारीपर्यंत वाढवली आहे. याशिवाय, अर्जात काही बदल असल्यास त्यात दुरुस्ती करण्याची मुदत १९ ते २५ फेब्रुवारी पर्यंत असणार आहे.

**//<><><><><>//**